दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ३१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.२ मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## शेवटचं गाव महाराष्ट्रात येईपर्यंत लढा सुरूच : अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राची ही शूरांची, वीरांची, संत-महात्म्यांची, समाजसुधारकांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसारखे युगपुरुष या भूमीत जन्मले. रयतेचं राज्य, स्वराज्य स्थापन करुन राज्यकारभाराचा आदर्श त्यांनी घालून दिला. या महामानवांनी दिलेला विचार, दाखवलेल्या वाटेवरुन चालण्याचा प्रयत्न महाराष्ट्रानं, राज्य सरकारनं कायम केला आहे. सर्वांना सोबत घेऊन, विकासाची समान संधी उपलब्ध करुन देण्याची ग्वाही देत राज्यातील जनतेच्या एकजूट व निर्धाराच्या बळावर महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल अखंड सुरु राहील, असे अजित पवार म्हणाले. यावेळी, कर्नाटक सीमा भागातील प्रश्नावरही त्यांनी बेधडक मत व्यक्त करत कर्नाटक सरकारला ठणकावलं आहे. महाराष्ट्राची, महाराष्ट्रवासियांची एकी कोणीही तोडू शकत नाही, असा विश्वास व्यक्त करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. पुढे बोलताना ते म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी महाराष्ट्रवीरांच्या त्यागाचं स्मरण करुन कृतज्ञता व्यक्त केली, तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील शहीद वीरांना आदरांजली वाहिली.

### महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण

# महाराष्ट्राने एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी ठरविली विकासाची पंचसूत्री : राज्यपाल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविड काळ असूनही राज्याने प्रगती आणि विकास यात कुठेही खंड पडू दिला नाही. महाराष्ट्राने देशातले एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था असलेले पहिले राज्य होण्यासाठी विकासाची पंचसूत्री ठरविली असल्याचे गौरवोद्गार राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी काढले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज मैदानात आयोजित मुख्य शासकीय समारंभात राज्यपाल श्री.कोश्यारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, श्रीमती रश्मी ठाकरे, मुंबई जिल्ह्याचे पालकमंत्री असलम शेख, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी तथा प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, तीनही सेनादलांचे वरिष्ठ अधिकारी, विविध देशांचे वाणिज्य दूत, विशेष निमंत्रित आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.



यावेळी राज्याला संबोधित करताना राज्यपाल श्री.कोश्यारी म्हणाले, कोरोनाच्या तीन लाटांचा नियोजनबद्ध रीतीने सामना करीत असताना महाराष्ट्राने देशात एक उदाहरण निर्माण केले आहे. राज्यातल्या ९२ टक्क्यांपेक्षा अधिक प्रौढ लोकसंख्येला लसीचा कमीत कमी एक डोस दिला असून उर्वरित लसीकरण गतीने पूर्ण होत आहे. नीती आयोगाने जाहीर केलेल्या Export Preparedness Index मध्ये महाराष्ट्र राज्य देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे याबाबत आनंद व्यक्त करून केंद्र शासनाच्या 'सुशासन निर्देशांक अहवाल-२०२१' मध्ये महाराष्ट्राने दुसरे स्थान मिळविले असल्याचे त्यांनी सांगितले. इलेक्ट्रिक वाहनांबाबत राज्य शासनाने तयार केलेले धोरण व्यापक आणि सर्वांगिण असून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत राज्यातील इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी १५७ टक्क्यांनी वाढली आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या नागरिकांना तसेच गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. शहरे कार्बन न्यूट्रल करण्याच्या अनुषंगाने राज्यातील ४३ अमृत शहरे रेस टू झिरोमध्ये सहभागी झाली आहेत.

कोरोना संकटकाळात गरीब आणि गरजूंना शिवभोजन थाळी नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात आली. सध्या राज्यात १ हजार ५४९ शिवभोजन केंद्रे सुरू असून ९ कोटी १८ लाख इतक्या शिवभोजन थाळ्यांचे वितरण करण्यात आले आहे. राज्य शासनाने दिल्ली-मुंबई कॉरीडॉरलगत रायगड जिल्ह्यात २ हजार ५०० एकर क्षेत्रावर बल्क ड्रग पार्कचे नियोजन केले आहे. तसेच औरंगाबाद नजीक बिडकीन येथील ऑरीक स्मार्ट सिटीमध्ये ३५० एकर क्षेत्रावर पायाभूत सुविधांनी युक्त वैद्यकीय उपकरण पार्कचे नियोजन केले आहे. पर्यावरणपूरक नैसर्गिक वायूच्या वापरास प्रोत्साहन देण्याकरिता नैसर्गिक वायूवरील मूल्यवर्धित कराचा दर १३.५ टक्यावरून कमी करून ३ टक्के इतका केला आहे, त्यामुळेही नागरिकांना दिलासा मिळत असल्याचे राज्यपाल श्री.कोश्यारी यांनी सांगितले.

परिवहन सुविधांबाबत सांगताना राज्यपाल कोश्यारी म्हणाले, रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरील ताण कमी व्हावा यासाठी प्रवासी जलवाहतुकीला शासन चालना देत असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले, नवी मुंबईतील बेलापूर येथून मुंबई, एलिफंटा, जेएनपीटी या जलमार्गावर वॉटर टॅक्सी सेवा सुरू करण्यात आली आहे. पालघर, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जेट्टींची कामे सुरू आहेत. राज्यातील गड आणि किल्ल्यांचे तसेच प्राचीन मंदिरांचे जतन आणि संवर्धन करण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. नवी मुंबई येथे तिरूमला तिरूपती देवस्थानास व्यंकटेश्वराचे मंदिर उभारण्यासाठी जमीन देण्याचा निर्णयही घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना त्यांनी भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त कामगारांच्या आणि श्रमिकांच्या घामातून हा महाराष्ट्र घडला आहे, त्यांचे स्मरण ठेवणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवरायांच्या कर्तृत्वाने महाराष्ट्र ओळखला जातो. महात्मा जोतिराव फुले, क्रांतीजोती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर अशा अनेक विभूतींनी महाराष्ट्राला सामाजिकदृष्ट्या समृद्ध केल्याचे ते म्हणाले. राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. या दृष्टीने एक नवीन आणि बलशाली महाराष्ट्र घडविण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन राज्यपाल श्री.कोश्यारी यांनी सर्व नागरिकांना केले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त महापालिकेत ध्वजारोहण कार्यक्रम उत्साहात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज मैदानावर आज(१ मे) महापौर डॉ कविता किशोर चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी उप महापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम पाटील यांच्या सह नगरसेवक, नगरसेविका, अतिरीक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त कल्पिता पिंपळे, सहाय्यक आयुक्तवंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे उपस्थित होते.

यावेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल, पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन केले तसेच ध्वजाला मानवंदना दिली. शिक्षण विभागाच्यावतीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले. यावेळी महापालिका अधिकारी, कर्मचारी, जेष्ठ नागरिक, नागरिक, पत्रकार उपस्थित होते. महाराष्ट्र दिनानिमित्त हुतात्मा स्मारक येथेही स्वातंत्र सैनिक बबन धरणे यांच्या पत्नी तारा बबन धरणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळाच्यावतीने सलामी देण्यात आली. यावेळी स्वातंत्र सैनिक उत्तरिधिकारी संघटनेचे सदस्य, पालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## नाविण्यपूर्ण उपक्रम, योजनांतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील नागरिकांना माझी वसुंधरा, गरूडझेप स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व कातकरी उत्थान अभियानाच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा तत्परतेने देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशाच प्रकारे नाविण्यपूर्ण उपक्रम, योजनांतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड कु. आदिती तटकरे यांनी आज येथे केले.




अलिबाग येथील पोलीस परेड मैदान येथे ०१ मे, महाराष्ट्र दिनाच्या ६२व्या वर्धापनदिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण पालकमंत्री कु.तटकरे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. पालकमंत्री कु.आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, आपला रायगड जिल्हा हा वार्षिक नियोजन विकास निधीचे संपूर्ण विनियोजन करण्यात राज्यात अव्वल स्थानी आहे. प्रत्येक समाज घटकांचा सर्वकष विचार व विकास साधण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. जगभरात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषांत सुलभता व सहजता आणून विद्यार्थ्यांना १०० टक्के लाभ देण्यात यश मिळाले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्यातून पोस्ट व प्रि-मॅट्रीक स्कॉलरशिप, स्वाधार, रमाई आवास, वसतिगृहे व निवासी शाळा, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास व बार्टीमार्फत जिल्हावासीयांना सहाय्य उत्तमरित्या होत आहे.

अलिबाग तालुक्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाबाबत त्या म्हणाल्या की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचा भूमीपूजन सोहळा अलिकडेच दूरदृश्यप्रणालीद्वारे सन्माननीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आणि आदरणीय खासदार शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला असून रायगडकरांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची व भविष्यातील डॉक्टर होऊ पाहणाऱ्यांची स्वप्नपूर्ती झाली आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांची पहिली तुकडी नुकतीच सुरू झाली आहे, या विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. याशिवाय जिल्ह्यातील दळणवळणासाठी सार्वजनिक बांधकामांतून अलिबाग-रोहा रस्ता, पोयनाड नागोठणे रस्ता, पाली-पाटणूस व मुरूड-रोहा-कोलाड-पुणे आदी कामे प्रगतीपथावर आहेत.

आरोग्य संपन्न रायगड जिल्हा करण्यासाठी शासकीय …/२

## संक्षिप्त...

### नोटबंदीप्रमाणे देशभर भोंगाबंदी करा : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनसेप्रमुखराज ठाकरे यांच्या आज औरंगाबाद येथे होणाऱ्या बहुचर्चित सभेमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहेत.

दरम्यान, राज ठाकरे यांनी कडवट हिंदुत्ववादी भूमिका घेतल्याने राज्यातील सत्ताधारी असलेल्या शिवसेनेचे नेतेही आक्रमक प्रतिक्रिया देत आहेत. आता, शिवसेना पक्षप्रमुख आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही राज ठाकरे आणि मनसेवर थेट हल्लाबोल केला. तसेच हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून बोचरी टीका करत खडेबोलही सुनावले आहेत. मनसेच्या भोंगाबंदीच्या निर्णयावर बोलताना उद्धव ठाकरेंनी हा चेंडू केंद्र सरकारच्या कोर्टात टाकला.

भोंग्याचा मुद्दा गाजलाय असं मला वाटत नाही. कारण, तो सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे, तो निर्णय देशभर लागू आहे. गतआठवड्यात गृहमंत्र्यांनी त्यासंदर्भात एक बैठकही घेतली. त्यामध्ये असंच ठरलं की, जसं नोटबंदी केली, लॉकडाऊन केलं, हा निर्णय देशभर लागू केला होता. त्याचप्रमाणे भोंगाबंदीही देशभर करा, असे म्हणत मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी भोंग्याचा चेंडू केंद्राकडे ढकलला आहे. या याचिकेतील निर्णयात केंद्र सरकार एक पार्टी होती, त्यामुळे केंद्र सरकारनेच हा निर्णय घ्यायला हवा, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले.

## नवीन पनवेलमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित, नागरिक संतप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मार्च-एप्रिल महिन्यापासून नवीन पनवेल परिसरात विजेचा लपंडाव मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळत आहे. कित्येक तास वीज गायब होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यानिमित्ताने महावितरणचा भोंगळ कारभार समोर आला आहे. त्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत.

उन्हाल्याला सुरुवात झालेली आहे. तापमानात वाढ झाल्याने अंगाची काहिली होत आहे त्यातच दर दिवशी नवीन पनवेल परिसरातील वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. रात्रीच्या वेळेस देखील वीज पुरवठा खंडित होत असल्याने मच्छरांचा उपद्रव जाणवू लागला आहे. सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्री या चारही वेळेला कधीही वीज गायब होत असल्याने नक्की वीज कोणत्या वेळेला असते असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत. वारंवार वीज गायब होत असली तरी देखील वीज बिल कमी होण्याचे नाव घेत नाही. नवीन पनवेलमध्ये महावितरणचे लाखो वीज ग्राहक आहेत. मात्र दररोज त्यांना विजेचा लपंडाव सहन करावा लागत आहे. सततच्या विजेच्या जाण्यामुळे विद्युत उपकरणे खराब होण्याची भीती वर्तविण्यात येत आहे. दिवसा वीज जातेच शिवाय रात्री देखील वीज गायब होत असल्याने व्यवस्थित झोप देखील मिळत नसल्याची व्यथा नागरिक मांडत आहेत. विजेची समस्या त्वरित सोडवावी …/२

## धरण दुरुस्तीच्या कामासाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करून देणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । उरण**

घारापुरी बेटाच्या विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने तयार करण्यात आलेल्या मंजूर विकास आराखड्यातील कामांना गती देणे, गळती लागलेल्या धरणाच्या दूरुस्तीसाठी पाच कोटींचा निधी, शिवडी - न्हावा सि-लिंग बाधित मच्छीमारांना आर्थिक नुकसान भरपाई आणि बेटावर येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी ग्रामपंचायतीला मी बंदर विभागाच्या माध्यमातून स्वागत कक्ष बांधून देणेआदी विविध विकासकामे तातडीने मार्गी लावण्याचे स्पष्ट आदेश रायगडच्या पालकमंत्री तथा पर्यटन विभागाच्या राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतुन दिले आहेत.



घारापुरी बेट जागतिक कीर्तीचे पर्यटन क्षेत्र असल्याने बेटावर येणाऱ्या पर्यटकांना व येथील ग्रामस्थांना भेडसावणाऱ्या समस्या बाबत ग्रामपंचायतीकडून रायगडच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे यांना निवेदन दिले होते.त्यानंतर ग्रामपंचायतीचे सरपंच बळीराम ठाकूर, शिष्टमंडळ आणि ग्रामस्थांनी जानेवारी २०२२ रोजी राज्यमंत्री यांची भेट घेऊन बेटाच्या विकासासाठी विविध शासकीय विभागांनी तयार करण्यात आलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला तत्काळ गती देण्यासाठी बैठक बोलाविण्याची मागणी केली होती.

घारापुरी ग्रामपंचायतीच्या मागणीला प्रतिसाद देत शनिवारी संध्याकाळी बेटावर विविध …/२

## महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२ वा वर्धापन दिन कर्जत मध्ये उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२ वा वर्धापन दिन कर्जत मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आज बहुसंख्य शाळांमध्ये परीक्षांचे निकाल असल्याने तत्पूर्वी त्या शाळांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले.

आज रविवार दि. १ मे महाराष्ट्र दिना निमित तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या शासकीय समारंभास प्रांत अधिकारी अजित नैराळे यांच्या हस्ते धवजरोहण करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार विक्रम देशमुख, यांच्यासह पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सोपान बाचकर, नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, डॉ. ज्योती मेगाळ, सुवर्णा निलधे, विशाखा जिनगरे, मधुरा चंदन, शिवसेना तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, शिवराम बदे, पंकज पाटील, अंकुश घोडविंदे, प्रशांत उगले आदी उपस्थित होते.



नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक बळवंत घुमरे, हेमंत ठाणगे, नगरसेविका पुष्पा दगडे, …/२

# चिंताजनक उदासीनता

दिल्लीसह देशाच्या काही भागांत कोव्हिडच्या रुग्णांची संख्या वाढत असताना, प्रतिबंधक लशीचा संरक्षक डोस घेण्याला मिळत असलेला अत्यल्प प्रतिसाद चिंताजनक आहे. लशीच्या पहिल्या दोन डोससाठी राबविण्यात आलेली मोहीम यशस्वी झाल्याच्या पार्श्वभूमीवर, आता दिसत असलेल्या निरुत्साहाची कारणे शोधायला हवीत. कोव्हिडची साथ सुरू होऊन दोन वर्षे लोटली. पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत साथरोगाची मोठी दहशत होती. विशेषत: दुसऱ्या लाटेत संसर्ग वेगाने वाढत होता, रुग्णालये अपुरी पडत होती, औषधांपासून ऑक्सिजनपर्यंत अनेक गोष्टींची कमतरता होती. याच काळात कोव्हिडमृत्यूंची संख्या सर्वांत जास्त झाली. कोव्हिडची दहशत याच काळात निर्माण झाली. रुग्णालये सज्ज ठेवण्यात आणि रुग्णांना आवश्यक उपचार सुविधा देण्यात केंद्र आणि राज्य सरकारला मोठे अपयश आले. त्या पार्श्वभूमीवर लसीकरणाची व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आणि विलक्षण वेगाने ती राबविण्यात आली. साथीची तीव्रता कमी होऊ लागल्यावर लसीकरणाचा वेग काहीसा मंदावला; परंतु तोपर्यंत बहुतेकांना दोन्ही डोस मिळाले होते. बारा ते अठरा वर्षे या कुमारवयीन गटाच्या लसीकरणालाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत देशात लशीचे १.८८ अब्ज डोस दिले गेले आहेत. बरोबर वर्षभरापूर्वीच्या परिस्थितीशी तुलना करता ही कामगिरी समाधानकारक म्हणावी लागेल; मात्र कोव्हिडचा धोका अद्याप टळला नसल्याने आणि तिसरा संरक्षण डोस घेण्याचा सल्ला तज्ज्ञ देत असल्याने, त्यासाठी व्यापक मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे. तसे झाले, तरच करोना विषाणूच्या विविध प्रकारांचा प्रतिकार करता येईल. प्रतिबंधक लशीचे पहिले दोन्ही डोस केंद्र सरकारतर्फे सर्वांना मोफत देण्यात आले. तिसऱ्या डोसबाबत ही स्थिती नाही. आरोग्य कर्मचारी, पोलिस आदी कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक यांना सरकारी रुग्णालयांत तिसरा डोस मोफत आहे; मात्र १८ ते ५९ या वयोगटातील लोकांसाठी खासगी रुग्णालयात तिसरा डोस सशुल्क आहे. दुसरा डोस घेऊन ३९ आठवडे झालेली व्यक्ती संरक्षक डोस घेण्याला पात्र आहे. त्यासाठीचे लसीकरण सुरू होऊन दोन आठवडे झाले असले, तरी पात्र असणाऱ्या बहुतेकांनी त्याकडे पाठ फिरवली आहे. राज्यात आतापर्यंत केवळ ७५ हजार जणांनी हा डोस घेतला आहे. प्रतिबंधक लशीबाबत जागरुकता असलेल्या ठिकाणी, म्हणजेच महानगरांतही डोस घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. मुंबईत, पुणे, ठाणे या ठिकाणी तिसरा डोस घेतलेल्यांची संख्या दहा हजारांच्या वर आहे. राज्यातील उर्वरित जिल्ह्यांत ती नगण्य आहे, तर आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या जालन्यासह १८ जिल्ह्यांत एकाही व्यक्तीने अद्याप तिसरा डोस घेतलेला नाही. लस सशुल्क असणे हे त्यामागचे एक कारण असू शकते; परंतु आरोग्यतज्ज्ञ अन्य कारणांकडेही अंगुलिनिर्देश करीत आहेत. तिसरा डोस घेण्याची आवश्यकता नाही, असा अपप्रचारही होत आहे. गेल्या वर्षी कोव्हिडची जी दहशत होती, ती आता दिसत नाही. करोना विषाणू स्वत:त जनुकीय बदल करीत राहतो; त्यामुळे त्याचे वेगवेगळे व्हेरियंट येत असून, साथीच्या लाटा अजून येत राहणार आहेत. जानेवारीतली तिसरी लाट तुलनेने सौम्य होती; त्यामुळेही कोव्हिडबद्दल काहीसा बिनधास्तपणा येताना दिसतो आहे. कोव्हिडमुळे लादलेले सर्व निर्बंध हटविण्यात आले असून, जनजीवन पूर्ववत होत आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी मास्कची सक्तीही रद्द केली आहे. करोना संपला, अशी भावना यातून निर्माण झाली असून; त्यामुळेही लसीकरणाबाबत उदासीनता दिसते आहे. उपाययोजनांसह आणि रुग्णालयांच्या सज्जतेसह तिला सामोरे जाणे महत्त्वाचे आहे. सुरक्षित वावर, मास्क आणि हातांची स्वच्छता ही त्रिसूत्री लक्षात ठेवावी लागेल. संसर्गाचा धोका पाहता पुन्हा एकदा मास्कची सक्ती करण्याचा विचार व्हावा. आरोग्य कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक यांना संरक्षक डोस देण्यासाठी मोहीम राबवावी. त्यासाठी राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांची; तसेच स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जावी. सशुल्क लसीकरण असलेल्या घटकांमध्ये जागरुकता निर्माण करायला हवी. लशींची उपलब्धता ही समस्या सध्या नाही; लोकांना लसीकरण केंद्रांपर्यंत नेण्याचे आव्हान मात्र आहे. कुमारवयीन मुलांच्या लसीकरणालाही गती द्यायला हवी. पाच ते बारा वर्षे वयोगटातील मुलांच्या लशीलाही आता मान्यता मिळाली आहे. थोडक्यात, आता सर्व वयोगटांसाठी लस उपलब्ध असून, सर्वांनी लस घ्यावी याकरिता जोरकस प्रयत्न व्हायला हवेत. कोव्हिडच्या विरोधात सुरक्षा कवच मिळाले, तरच तीव्र लाटेचा धोका, त्यामुळे लावले जाणारे निर्बंध आणि त्यातून होणारा अनर्थ टळेल. यासाठी नव्याने जनजागृती करायला हवी.

# शिवकालीन शस्त्र जाज्वल्य इतिहासाचे साक्षीदार : प्रशांत स्वामी

## शिवरुद्र बहुउद्देशीय संस्थेने आयोजित केलेल्या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाला श्रीवर्धनकरांचा उदंड प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । दिघी**

आपल्या महाराष्ट्राचा इतिहास गौरवशाली आहे. छत्रपतींच्या कार्यकर्तृत्वाने महाराष्ट्र अस्मितेची पताका देशाच्या कानाकोपऱ्यात फडकली. आपल्या महाराष्ट्राला कणखर, रागट, दणकट राज्य असे इतिहासकारांनी संबोधले आहे. शिवकालीन शस्त्र मराठी अस्मितेचे प्रतीक आहेत. असे प्रतिपादन श्रीवर्धनचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत स्वामी यांनी केले आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेच्या शाळा नंबर एक च्या सभागृहात शिवरुद्र संस्थेच्या वतीने शैलेंद्र ठाकूर व शुभम चवरकर यांनी आयोजित केलेल्या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे प्रशांत स्वामी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर प्रसंगी श्रीवर्धनचे नायब तहसीलदार विपुल ढुमे, श्रीवर्धन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे, श्रीवर्धन प्रांताधिकारी यांच्या पत्नी श्वेता शेडगे, डव्होकेट संतोष सापते, रूपा सुखदरे, मयुरी वैद्य, तेजस ठाकूर, श्रीवर्धन मधील इतिहास प्रेमी नागरिक आदी उपस्थित होते.

शिवरुद्र कराटे अकॅडमी चे विद्यार्थी व उपस्थित इतिहासप्रेमी नागरिकांना प्रशांत स्वामी यांनी संबोधित केले. स्वामी म्हणाले शिवरुद्र संस्थेचा हा उपक्रम निश्चितच इतिहास प्रेमी नागरिकांसाठी आणि श्रीवर्धन मधील तरुणाईसाठी प्रेरणादायी आहे. शिवकालीन ज्ञात-अज्ञात सर्व शस्त्रांची माहिती आज मला या ठिकाणी मिळाली याचा निश्चितच आनंद आहे. आज पर्यंत जे फक्त टीव्ही मालिका व चित्रपट यामध्ये बघितलेली शस्त्र आज प्रत्यक्ष बघण्याचा योग आला. शिवकालीन शस्त्र हे शिवछत्रपतींच्या कल्पकतेचा दूरदृष्टीचा प्रत्येक वेळी प्रत्यय देतात. शिवछत्रपतींनी दूरदृष्टी ठेवून गनिमांना अचूक टिपण्यासाठी तयार केलेल्या प्रत्येक शस्त्राबद्दल निश्चितच कुतूहल आहे. शिवछत्रपती सारखा दूरदृष्टीचा राजा आपणास लाभला हे आ-पले भाग्य आहे. आपल्या संस्थेच्या वतीने आलेल्या प्रत्येक इतिहास प्रेमीला निश्चितच दर्जेदार व उपयुक्त माहिती देण्यात आलेली आहे त्याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे असे प्रशांत स्वामी यांनी सांगितले.

शिवरुद्र संस्थेच्या वतीने आयोजित शस्त्र प्रदर्शनामध्ये तलवार, ढाल, बनाटा, बिचवा, कट्यार, तोफ गोळे, गोफण, वाघनखे, खंजीर, भाला त्यासोबत मराठा मुघल आणि राजपूत यांच्याकडील विविध प्रकारच्या तलवारी प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आल्या. प्रत्येक तलवारीचे वैशिष्ट्य, आकार,वजन याची माहिती शिवरुद्र संस्थेच्यावतीने प्रदर्शनात उपस्थित असणाऱ्या इतिहासप्रेमींना देण्यात आली.

# तरुणाचा मोबाईल केला लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील चिपळे गाव येथे भाजी घेण्यासाठी गेलेल्या २४ वर्षीय तरुणाचा मोबाईल चोरल्याची घटना घडली आहे.

कोप्रोली येथील अरिहंत अरहंम बिल्डिंग मध्ये राहणारा मोसीन इनामदार हा चिपळे -आकुर्ली डेअरी जवळ भाजी घेत असताना डेअरीच्या टेबलावर मोबाईल ठेऊन तो विसरून गेला.

काही वेळाने त्याच्या लक्षात आल्या नंतर त्या ठिकाणी जाऊन त्यांनी बघितले असता त्याठिकाणी फोन दिसून आला नाही. अज्ञाताने तो फोने चोरून नेल्याने या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# पोलादपूर मध्ये बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे कामगार दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून पोलादपूर येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकामध्ये बांधिलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रसाद इंगवले यांच्यावतीने कामगार दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी पोलादपूर शहराच्या नगराध्यक्षा सोनल गायकवाड तसेच महिला व बालकल्याण सभापती अस्मिता पवार व पोलादपूर स्थानक प्रमुख राजन सुतार यांच्या प्रमुख उपस्थितीत चालक आणि वाहक यांना गुलाबपुष्प भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

सुमारे पाच महिन्याच्या काळानंतर पूर्वपदावर आलेल्या एसटी बस सेवेतील बसला म्हणजेच लालपरीला पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी एस.टी. स्थानकामध्ये जिलेबीने तोंड गोड करून कामगार दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी बांधिलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रसाद इंगवले यांनी उपस्थितांचे आभार मानले व बससेवेच्या प्रवासाला शुभेच्छा दिल्या.

# पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी तालुक्यातील अवैध धंदे केले बंद



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली पोलीस स्थानकात शुक्रवारी (ता.२९) सायंकाळी पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे व पत्रकारांची बैठक संपन्न झाली. यावेळी विविध विषय व समस्यांवर चर्चा करण्यात आली. सुधागड तालुक्यातील मटका व्यवसाय व अवैद्य धंदे सर्वप्रथम बंद केले आहेत. शिवाय गावठी दारू निर्मिती व विक्रीवर देखील टाच आणली असल्याची माहिती काईंगडे यांनी यावेळी दिली.

पालीतील वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी हटाळेश्वर देवळाजवळ पार्किंग करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच अवजड वाहतुकीवर नियंत्रण आणण्यात यावे असे पत्रकारांनी सांगितले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई केली जाईल असे काईंगडे यांनी सांगितले. आणि त्यानुसार शनिवारी (ता.३०) बेकायदेशीरित्या पार्क केलेल्या मोटारसायकल चालकांवर कारवाई देखील करण्यात आली.

पाली अंबा नदीवरील पुलाचा प्रश्न काईंगडे यांनी सामोपचाराने सोडवला आहे. संबंधित शेतकरी व एमएसआरडीसी प्रशासन यांच्यात समेट घडवून आणली आहे. त्यामुळे पुलातील अडथळा दूर होऊन पुलाचे रखडलेले काम आता सुरू झाले असल्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जनतेचे देखील चांगले सहकार्य मिळत आहे. असे देखील काईंगडे म्हणाले. यावेळी विविध विषयांवर चर्चा होऊन उपाय सुचविण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नवीन पनवेलमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित, नागरिक संतप्त

अशी मागणी नागरिक करत आहेत. वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरणला फोन केल्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी फोन उचलत नसल्याचे रहिवासी सांगतात. तसेच लैंडलाईन बाजूला काढून ठेवतात. त्यामुळे फोन नेहमीच व्यस्त लागतात. याकडे वरिष्ठानी लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

## नाविण्यपूर्ण उपक्रम, योजनांतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध : ना.आदिती तटकरे

वैद्यकीय यंत्रणांमध्ये अद्ययावतीकरण व बळकटीकरण या माध्यमातून जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे-उपकेंद्रे, जिल्हा-उपजिल्हा रुग्णालये, मानगांव ट्रॉमा केअर सेंटर्स, भुवनेश्वर रोहा येथील स्त्री व नवजात बाल रुग्णालय बांधणीसाठी आवश्यक त्या विकासप्रकीया प्राधान्याने पार पडत आहे.

आरोग्य विभाग, जिल्हा रायगड परिषद मार्फत प्रधानमंत्री मातृ वंदना योजना राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी एकूण ५९ हजार १५२ चे उद्दिष्ट असून माहे मार्च २०२२ अखेर ५५ हजार ३७३ लाभार्थी मातांची नोंदणी करण्यात आली आहे. एकूण उद्दिष्टांच्या ९४ टक्के काम झाले आहे. तसेच जननी सुरक्षा योजनेंतर्गत एकूण ५ हजार ६९७ लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून माहे मार्च २०२२ अखेर एकूण २ हजार ५९८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यात कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणास नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून अद्याप लसीकरण न झालेल्यांना या निमित्ताने लसीकरणासाठी पुढे यावे, असे जनतेला आवाहन करीत त्या पुढे म्हणाल्या, शासनाच्या सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्व-उत्पन्नाचा ५ टक्के निधी दिव्यांग व्यक्तींसाठी नाविणपूर्ण योजनेमार्फत राबविण्यासाठी प्रशासनास सूचना दिल्या आहेत. गडकिल्ले, अभयारण्य, निथळ समुद्रकिनारे हे आपले वैभव जपण्यासाठी व येथील सौंदर्यामध्ये अधिक भर टाकण्याचा प्रामाणिक प्रयत्न प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमार्फत साधण्यात मोठे यश मिळाले आहे. समुद्रकिनारे, ऐतिहासिक स्थळे, महत्त्वाची धार्मिक स्थळांवरील पायाभूत सोई-सुविधा व सौंदर्यीकरणाच्या कामांसाठी सुमारे ४० कोटींहून अधिक निधी विकासकामांसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून वितरीत करण्यात येत आहे.

जिल्ह्यातील थोर स्वातंत्रसेनानी-क्रांतिकारकांची स्मारके व वीरभूमीचे ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या वास्तूंच्या विकासाबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, स्वातंत्र्याची ही पंचाहत्तरी हा सूवर्णकाळ ज्यांच्यामुळे आपण अनुभवत आहोत, असे थोर स्वातंत्रसेनानी-क्रांतिकारकांची स्मारके व वीरभूमीचे ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या वास्तूंचे जतन, संवर्धन व सौंदर्यीकरणाची कामे प्राधान्याने करण्यात येत आहेत. ज्यामध्ये सरदार तानाजी मालुसरे स्मारक-उमरठ, शिवतीर्थ समरभूमी-उंबरखिंड-खालापूर, विरमाता जिजामाता समाधी-पाचाड, महाड, शहीद निलेश तुणतुणे स्मारक-अलिबाग, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके स्मारक-पनवेल, भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रीय स्मारक-महाड, हुतात्मा हिराजी पाटील स्मारक-कर्जत, अलिबाग चरी येथील शेतकरी स्मारक, व्हिक्टोरिया क्रॉस पदक विजेते कॅप्टन यशवंतराव घाडगे स्मारक-माणगाव, उरणचा चिरनेर सत्याग्रह, शेषनाथ वाडेकर स्मारक-अलिबाग, आचार्य विनोबा भावे यांचे गागोदे येथील स्मारक, सरखेल कान्होजी आंग्रे स्मारक-अलिबाग, हुतात्मा स्मारक-पेण आदींचा समावेश आहे. आपल्या भाषणात पालकमंत्र्यांनी पहिली महिला मेट्रो पायलट रोह्याची गार्गी ठाकूर त्याचबरोबर नाविण्यपूर्ण कल्पनेतून वणवा विरोधी ड्रोन बनविणाऱ्या श्री.रतिश पाटील यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच जिल्ह्यात माझी वसुंधरा, कातकरी उत्थान अभियान, गरूडझेप स्पर्धा परिक्षा केंद्र असे उपक्रम जिल्हा प्रशासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून यशस्वीपणे राबविण्यात येत आहे, जिल्ह्यात पोलीस विभागाकडून कायदा व सुव्यवस्थाही उत्तम प्रकारे सांभाळली जात आहे, यासाठी त्यांनी जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचेही अभिनंदन केले.

शेवटी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, योजनांतून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न माझ्याकडून कायम असेल. यासाठी आपल्या सर्वांचे असेच सहकार्य लाभेल, अशी आशा व्यक्त करून पालकमंत्री कु.तटकरे यांनी पुनःश्च एकदा सर्व जिल्हावासियांना महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## धरण दुरुस्तीच्या कामासाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करून देणार : ना.आदिती तटकरे

शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची रायगडच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी बैठक घेतली. या बैठकीस भारतीय पुरातत्व विभागाचे प्रभारी अधिकारी कैलास शिंदे, एमटीडीसीचे सहाय्यक अभियंता नागरे, उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, नवी मुंबईचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, मोरा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजित मोहिते, ग्रामपंचायतीचे सरपंच बळीराम ठाकूर, उपसरपंच सचिन म्हात्रे, सदस्य मंगेश आवटे, भरत पाटील, लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष रमेश पाटील, तंटामुक्त कमिटीचे अध्यक्ष सोमेश्वर भोईर, तसेच आजी-माजी पदाधिकारी व महसुल विभागातील अधिकारी वैजनाथ ठाकूर भावना घाणेकर , पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने बैठकीला उपस्थित होते. घारापुरी ग्रामपंचायतीचे सरपंच बळीराम ठाकुर यांनी घारापुरी बेटाच्या विकासासाठी व बेटाचा कायापालट होईल असा विकास आराखडा पर्यटन विभागाने तयार केला आहे.या विकास आराखड्याला ८ सप्टेंबर २०२१ रोजी उच्च स्तरीय झालेल्या बैठकीत भारतीय पुरातत्व विभागाकडून मंजुरीही देण्यात आलेली आहे.मात्र कामाची अंमलबजावणी अद्यापही झालेली नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली.बेटावरील नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणाला गळती लागली आहे. जल मिशन योजनेअंतर्गत सदरच्या धरणाच्या दूरुस्तीसाठी आराखडा तयार करण्यात आला आहे.

या कामासाठी पाच कोटीपेक्षा अधिक निधीची आवश्यकता आहे.बेटावर येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी ग्रामपंचायतीकडे स्वागतकक्ष नसल्याचे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.शिवडी न्हावा सि-लिंक बाधित बेटावरील मच्छीमारांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याने नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळावी अशी मागणीही ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली. तसेच भारतीय पुरातत्व विभाग व शासकीय गाईड यांचेकडून लोकल गाईड यांना दुय्यम दर्जाची वागणूक देत असल्याच्या बाबींकडेही सरपंच बळीराम ठाकुर यांनी लक्ष वेधले. घारापुरी बेटाच्या विकासासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने तयार करण्यात आलेल्या मंजूर विकास आराखड्यातील कामांना गती देऊन विकासकामांची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.बेटवासियांची पाणी समस्या दूर करण्यासाठी गळती लागलेल्या धरणाच्या दूरूस्तीसाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याचेही आश्वासन देण्यात आले. शिवडी - न्हावा सि-लिंग बाधित मच्छीमारांना आर्थिक नुकसान भरपाई आणि बेटावर येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी ग्रामपंचायतीला बंदर विभागाच्या माध्यमातून स्वागत कक्ष बांधून देणे आदी विविध विकासकामे तातडीने मार्गी लावण्याचे स्पष्ट आदेश रायगडच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना शनिवारी बेटावर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतुन शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

## महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६२ वा वर्धापन दिन कर्जत मध्ये उत्साहात साजरा

प्राची डेरवणकर, विद्या विकास मंदिर विद्यालयाच्या श्रद्धा मुंढेकर, अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेत मुख्याध्यापक सच्चिदानंद जोशी, शारदा मंदिर विद्यालयात शालेय समिती सदस्य रवींद्र खराडे उपस्थित होते, कोंकण ज्ञानपीठ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिरीष पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.


# ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि. ०१/०५/२०२२

प्रति,

अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ०२/०५/२०२२ ते १०/०५/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ११/०५/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पेठ येथील विठ्ठल रुक्मिणी सभागृह रंगरंगोटी करणे व दुरुस्त करणे | २०३९०४/- | २०३९/- | १ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## तरुणाची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापूर, स्वागत सोसायटी येथे ३२ वर्ष तरुणाने साडीच्या सहाय्याने फॅनला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. राजेश दिवाकर रिसबुड असे मृत तरुणाचे नाव असून त्याने आत्महत्या केली का केली याचा तपास खांदेश्वर पोलीस करत आहेत.

## बोर्ली ग्रामपंचायतीत महाराष्ट्र दिन साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.ग्रामपंचायतीचे सरपंच चेतन जावसेन यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन,उपसरपंच मतीन सौदागर, सदस्य गणेश कट,सदस्या जगिता कोटकर, नम्रता शिंदे, ग्रामविकास अधिकारी पी.जी.गाडेकर, कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते.

# राज्यात सर्वत्र नगर परिषद, नगर पंचायत कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्य नगर परिषद ,नगर पंचायत कर्मचारी /संवर्ग कर्मचारी संघटनेच्या अनेक विविध मागण्या आहेत. या मागण्या बाबत संघटनेच्या वतीने अनेकदा पाठपुरावा, पत्रव्यवहार करून देखील शासन दरबारी संघटनेच्या मागण्या मान्य होत नसल्याने संघटनेच्या पदाधिकारी सदस्यांनी अर्थातच शासकीय कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.१ मे २०२२ रोजी कामबंद आंदोलनाचा पहिला दिवस आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील नगर परिषदेचे तसेच नगर पंचायतचे अधिकारी कर्मचारी वर्ग या बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी झाले आहेत.जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हा लढा असाच सुरु राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश पोसतांडेल यांनी दिली आहे.



विविध मागण्यासाठी संपूर्ण राज्यातील व उरण नगर परिषद मधील अधिकारी/ कर्मचारी वर्गांनी पहिल्या टप्प्यात एकत्र येत मागण्या बाबत दिनांक ५ एप्रिल २०२२ रोजी काळ्या फिती लावून निदर्शने केली तसेच दिनांक २० एप्रिल २०२२ रोजी आझाद मैदान ते मंत्रालय भव्य मोर्चा काढण्यातआला.तरी देखील शासनाने दुर्लक्ष केल्याने दिनांक १ मे २०२२ पासून अत्यावश्यक सेवांसाहित काम बंद आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रातील नगरपालिका, नगरपंचायत/ संवर्ग कर्मचारी करत आहेत.असे महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष सुरेश पोसतांडेल यांनी माहिती दिली.राज्यउपाध्यक्ष प्रदीप रावनकर, राज्यसरचिटनिस रामेश्वर वाघमारे, राज्यकोषाध्यक्ष अनिल पवार, राज्य कार्यकारी अध्यक्ष विश्वनाथ घुगे, रायगड जिल्हा अध्यक्ष सुनील जाधव यांनी माहिती दिली.उरण नगर परिषद स्थानिक संघटनेचे अध्यक्ष संतोष तेलंगे, उपाध्यक्ष मिलिंद जाधव, संतोष गुडेकर, सचिव संजय पवार, सहसचिव आकाश कवडे, खजिनदार संजय दाते, सहखजिनदार रमेश सरवदे, कार्याध्यक्ष नितीन कासारे, सह कार्याध्यक्ष नितीन कांबरे, संघटक अनिल जगधणी, झुंबर माने, महिला संघटक सुलोचना हलसे, देवयानी गोडे, मनीषा उमते, भारती करंगुटकर, रशिदा शेख, कांचन तारेकर, सल्लागार झुंबर माने, राजेश कदम, संजय डापसे, हरेश तेजी, जयराम पाटील, विजय पवार, धनेश कासारे, सचिन भानुसे, संतोष कांबळे, संजय परदेशी,रमेश सरवदे,प्रमोद मटकर, अनिल कासारे आदी उरण नगर परिषदेचे कर्मचारी या संपात, काम बंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. राज्यातील दोन लाखावर नगरपालिका नगरपंचायत कर्मचारी यांचे राज्यात सर्वत्र बेमुदत काम बंद आंदोलन सुरु आहे.प्रलंबित मागण्याबाबत प्रदीर्घ काळापासून सरकार तोडगा काढत नसल्याने कर्मचारी संघटनेने हा आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.महाराष्ट्रातील ३६९ पेक्षा जास्त नगरपालिका व नगरपंचायतीचे दोन लाखापेक्षा जास्त कर्मचारी महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत कर्मचारी /संवर्ग कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वात बेमुदत काम बंद आंदोलन करत आहेत .महाराष्ट्र सरकार या कर्मचाऱ्यांच्या मागण्या कडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्याने व कोणताही समाधानकारक तोडगा न निघाल्याने कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरु केला आहे.

# काशीद बीच पर्यटकांनी बहरले

**दै.रायगड नगरी । मुरुड**



मुरुड तालुक्यातील जगप्रसिद्ध असलेल्या काशीद बीचवर आज पर्यटकांची भरती आली होती. त्यामुळे काशीद बीचला समुद्राच्या भरती बरोबरच पर्यटकांचीही भरती भरती आल्याचे पहावयास मिळाले. त्यामुळे पुन्हा एकदा पर्यटन व्यवसायाला उभारी मिळाली आहे. गेल्या दोन वर्षांपासून कोरोना संकटाने हैराण झालेल्या पर्यटकांनी निर्बंध हटविले तरी भीती पोटी पर्यटन स्थळांवर जाणे टाळत होते आणि सतत होणाऱ्या हवामानातील बदलामुळे पर्यटकांनी घरीच बसणे पसंत केले होते.

एप्रिल महिन्यात हवामानातील बदलामुळे दोन वेळा उष्णतेच्या लाटेमुळे पर्यटकांची संख्या रोडावली होती. २५ एप्रिल नंतर मुरुड मधील हवामानातील उष्णता हळूहळू कमी होऊ लागली आहे. मुरूडचे तापमान ५ओ अंशाने कमी झाल्यामुळे मुरुड करांना व पर्यटकांना दिलासा मिळाला आहे. याचाच परिणाम म्हणून मुरुड च्या दिशेने पर्यटकांची पावले वळू लागली आहेत. त्यामुळे पर्यटकांचे मुरुड मधील सर्वात आवडते ठिकाण काशीद बीचवर पर्यटकांची मोठी भरती आली आहे. काशीद बीचवरील शुभ्र वाळू व सुरुची झाडे पर्यटकांना आकर्षित करतात.

परिक्षेचा कालावधी संपल्याने व निकाल हाती येताच पर्यटकांनी मुरुड कडे आपला मोर्चा वळवला आहे. मुंबई पासून सुमारे १३५ किमी व पुण्यापासून सुमारे १८० किमी अंतरावर असलेल्या काशीद बीचला पर्यटक मोठ्या संख्येने पुन्हा एकदा येण्यास सुरवात झाली आहे. मुरुड तालुक्यातील अजिंक्य जंजिरा किल्ला, दत्त मंदिर, गारंबी, फणसाड अभयारण्य या ठिकाणांना पर्यटक आवर्जून भेट देतात. आता कुठे मुरुडला पर्यटक येऊ ला-गले असल्याने पर्यटन व्यवसायाला पुन्हा एकदा उभारी मिळाली आहे.

# १ मे महाराष्ट्र दिन नगराध्यक्षांचे हस्ते ध्वजारोहण; माणगांवकरांची लक्षणिय उपस्थिती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

महाराष्ट्र राज्य स्थापणेचा ६२ व्या वर्धापन दिनाला, यंदा माणगांव नगरपंचायत कार्यालयात नगरपंचायतचे सर्वपक्षिय नगरसेवक तसेच नगरपंचायतचे सर्व कर्मचारी अधिकारी व सफाई कर्मचारी, पाणी पूरवठा कर्मचारी व माणगांवकरांची लक्षणिय उपस्थिती होती. राष्ट्रीय ध्वज स्तंभा भोवती सुंदर फुलांची रांगोळी काढण्यात आली होती. नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते रविवार १ मे रोजी सकाळी ०८.०० वाजता राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना नेते ॲड. राजीव साबळे, माणगांव नगरीचे माजी नगराध्यक्ष आनंद यादव तसेच विद्यमान उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, पाणी पुरवठा सभापती राजेश मेहता, स्वच्छता आरोग्य व क्रिडा समिती सभापती अजित तार्लेकर, महिला बालकल्याण व युवक कल्याण समिती सभापती शर्मिला शोभन सुर्वे तसेच उप सभापती नंदिनी नितीन बामगुडे सर्व नगरसेवक व नगर सेविका तसेच जेष्ठ पत्रकार रायगड भूषण अरुण पोवार, जेष्ठ पत्रकार मजिद हाजिते, नरेश पाटील, रायगड भूषण पत्रकार रविंद्र कुवेसकर मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

राष्ट्रध्वज फडकवताच राष्ट्रगीत गाण झाले. यानंतर महाराष्ट्र दिनाचा विजय असो! भारत माता कि जय! वंदे मातरम्! चा जयघोष करण्यात आला. उपस्थितांनी एकमेकास तसेच नगराध्यक्षांनी सर्वांना हस्तांदोलन करीत महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.




मा.राव साहेब कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील : ॲड.मनिष श्रॉफ**
**ॲड.एच.ए.भगत**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६२३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०६/२०२२

**श्रीमती.मानसी अलोक दास**
वय वर्षे : ५८, व्यवसाय : नोकरी
रा.अलोकदास, २९/३, सिंधी सोसायटी,
भक्ती भवन, चेंबुर, मुंबई-४०००७१ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मयत **श्री.मिहिर कुमार जसोदालाल सहा** हे दि.१७/०२/२०२० रोजी ठिकाण : बी-१, श्री गणेश को.हौ.सो., सेक्टर-२८, नेरुळ (पश्चिम), नवी मुंबई, ठाणे येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झाले. कसबे कामोठे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत ही मयत **श्री.मिहिर कुमार जसोदालाल सहा** व अर्जदार हिचे सामाईक स्वरुपाची नावे असलेली मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**कसबे : कामोठे, ता.पनवेल येथील प्लॉट नं.२४, सेक्टर १८, नालंदा को.ऑप.हौ.सो.लि, फ्लॅट नं.३०३, तिसरा मजला, (क्षेत्रफळ ३५७ चौ.फूट) (कार्पेट एरिया) आणि ६२ चौ.फुट (ओपन टेरेस)**

वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत मयत **श्री.मिहिर कुमार जसोदालाल सहा** यांचे वारसांनी म्हणजेच वर नमूद अर्जदार हिने मयत श्री मिहिर कुमार जसोदालाल सहा यांचे मृत्यूपश्चात अर्जदार हिचे कायदेशीर वारसदार आहे. अशा आशयाचा वारस दाखला मिळणेसाठी ना.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्जदार **श्रीमती.मानसी अलोक दास** ही मयत **श्री.मिहिर कुमार जसोदालाल सहा** यांचे कायदेशीर वारसदार आहे या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीच्या कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष कागदपत्रांसह हजर राहून लेखी घ्यावयाच्या आहेत. परंतु मुदतीत हरकती न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.३०/०४/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Shri.Rao Saheb

**J.D.Patel**

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE
SENIOR DIVISION PANVEL, AT PANVEL

Civil M.A. No. 560 Of 2022
Exh : 8/D
Next Date : 22/06/2022

**Kum.Ramesh Gokar Choudhary**
Age : 28 years, Occupation :
Residing at-Room No. Flat No.1002,
Plot No.11, Sonia Skyline,
Ghansoli Bus Stop, Sector-15, Ghansoli,
Thane, Navi Mumbai-400701 Applicant
V/s
**Kum.Rasila Gokar Choudhary**
Age : 27 years, Occupation : Service
**Smt.Bachiben Gokar Choudhary**
Aged : 52 years, Occupation : Houswife
**Smt.Puriben Murabhai Choudhary**
Aged : 89, Occupation : Housewife
Residing At : Ashtavinayak Soc, G1/3/12
Room No.4, Sector-06, At Post-Ghansoli
Thane, Navi Mumbai 400701 Opponents

Is hereby given that **Kum.Ramesh Gokar Choudhary** have filed the Miscellaneous Application No.560 of 2022 for grant of Heirship Certificate in the Court of the Civil Judge (S.D.) Panvel at Panvel in respect of the Immovable Property mentioned in the Schedule hereunder written.

**SCHEDULE OF PROPERTY**

**Shop No.09, Plot No.09, Vrundavan Park, Ground Floor, Sector-34, Kamothe, Tal-Panvel, Dist-Raigad, Navi Mumbai 410206. Admeasuring area 43.26 sq. mt. built up + 14.42 sq. mt. loft and the Property valud at Rs.11,40,000/- (Rupees Eleven lakhs Forty Thousand Only). for all purposes. 50% Share.**

Any person/s having any objection to the grant of Heirship Certificate shall file their objection in writing within 30 days of Publication of this Notice in the Court of the Civil Judge (S.D.) Panvel, at panvel or the Heirship Certificate shall be issued.

Panvel 30 April of 2022

Sd/-
Court Clerk
Civil Court, Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superint.
Civil Court, Panvel



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना सदर भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना सदर भूखंडाचे वाटपपत्र करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटपपत्र देण्यात/ करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/ करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | करंजाडे संचिका क्र. १३३ | १८०<br>१८० | ६/१अ/२/१<br>६/१अ/१/१ | ०-४८-४<br>०-१६-८ पैकी ०-०५-५ | **४५० चौ.मी.** | **मौजे-करंजाडे नोड, भूखंड क्र. ७८, सेक्टर-५, क्षेत्र ४४९.१७ चौ.मी.** | मूळ भूधारक **कै. हिरामण बाळू उरणकर (मयत) यांचे वारस कै. अनुसया हिरामण उरणकर (मयत) यांचे वारस**<br>१. सौ. वसुधा रमाकांत ननावरे<br>२. श्रीमती सुनंदा हिरामण उरणकर उर्फ सुनंदा रत्नाकर पाटील<br>३. श्रीमती वासंती अरुण गोरेगावकर<br>४. श्रीमती छाया संदीप शेलार<br>५. श्री. संतोष हिरामण उरणकर | |
| | **एकूण संपादित क्षेत्र** | | | **०-५३-९** | | | | |
| २ | करंजाडे संचिका क्र. ०९ | १६ | ११०+१११+ ११२/३अ+८ | १-०७-८ | **९५० चौ.मी.** | **मौजे-करंजाडे नोड, भूखंड क्र. २२A, सेक्टर-३, क्षेत्र ९४९.५१ चौ.मी.** | मूळ भुधारक **बयावबाई उर्फ बयाव काना उर्फ कान्हा पाटील (मयत) यांचे वारस**<br>१. भाऊ काना पाटील<br>२. रूख्मिणी केशव पाटील<br>३. श्याम केशव पाटील<br>४. हनुमान केशव पाटील<br>५. पंढरीनाथ केशव पाटील<br>६. हेमा केशव पाटील उर्फ हेमा दिलीप भगत<br>७. लताबाई उर्फ लता शंकर पाटील<br>८. सचिन शंकर पाटील<br>९. संदिप शंकर पाटील<br>१०. सारिका शंकर पाटील उर्फ सारिका राजेश सुरते<br>११. शैला बाळाराम सुरते<br>१२. श्री. शशिकांत सिताराम भगत<br>१३. श्री. दिलीप सिताराम भगत<br>१४. श्रीमती वनिता संजय पाटील<br>१५. श्रीमती सुनिता प्रमोद भोईर | |
| | **एकूण संपादित क्षेत्र** | | | **१-०७-८** | | | | |
| ३ | ११९ | करंजाडे ४६न्यु<br>करंजाडे १३०ब | १२८/६<br>९१/१<br>१०८/३<br>१११ब/४ | ०-१९-७<br>०-२७-१<br>०-०१-८<br>०-०३-८ | **४५० चौ.मी.** | **मौजे-करंजाडे, भूखंड क्र. ७५, सेक्टर-२A, क्षेत्र ४४९.६७ चौ.मी.** | **मा. न्यायालयीन वारसदाखल्यानूसार व तसेच हक्कसोडनूसार पात्र भुधारक**<br>१. श्री. जयेश भगवान पाटील उर्फ कोळी<br>२. श्री. विलास दत्ता पाटील उर्फ कोळी<br>३. श्री. विजय शंकर पाटील उर्फ कोळी<br>४. श्री. गणेश अशोक पाटील उर्फ कोळी | निरंक |
| | **एकूण संपादित क्षेत्र** | | | **०-५२-४** | | | | |
| ४ | तळोजा ३९४ | तळोजा ३७६<br>तळोजा ३७६ | ११/३<br>१२/३<br>११/६ | ०-०८-८<br>०-४०-५<br>०-०७-८ | **५०० चौ.मी. पैकी ५० चौ.मी.** | **भूखंड क्र. ६A, सेक्टर-१८, क्षेत्र ५० चौ.मी.** | **कै. एकनाथ हिरा कोळी (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. संतोष हिरा कोळी,<br>**२) कै. जयराम हिरा कोळी (मयत) यांचे वारस**<br>२.१) श्रीमती पुष्पा जयराम कोळी<br>२.२) श्री. अजय जयराम कोळी<br>२.३) श्री. केतन जयराम कोळी<br>२.४) श्रीमती प्रतिभा जयराम कोळी ,<br>३) श्रीमती दुर्गाबाई जग्गनाथ बहिरे,<br>**४) कै. अनुबाई जगन कोळी उर्फ अनुसया जगन्नाथ पाटील (मयत) यांचे वारस**<br>४.१) श्री. परमेश्वर जगन्नाथ पाटील,<br>५) श्रीमती शारदा एकनाथ कोळी | निरंक |
| ५ | खारघर १६६ | तळोजा १६८ | ३००/१+ २/अ | ०-७५-० | **६५० चौ.मी.** | **भूखंड क्र. ०८, सेक्टर-०७, क्षेत्र ६५० चौ.मी.** | **कै. विठाबाई जानु ठाकुर (मयत) यांचे वारस कै. दत्तू जाणू ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>**१) कै. हरिचंद्र दत्तू ठाकूर (मयत) यांचे वारस पैकी**<br>१.१) सौ. सिताबाई हरिचंद्र ठाकुर<br>१.२) श्री. जीवन हरिचंद्र ठाकुर<br>१.३) श्रीमती. शोभा धनाजी टकले<br>१.४) श्रीमती. नर्मदा धम्रनाथ पाटील<br>१.५) श्रीमती. राधा शंकर म्हात्रे,<br>१.६) कु. तृप्ती हरिचंद्र ठाकुर उर्फ तृप्ती विकास पाटील,<br>२) धृवचंद्र दत्तू ठाकूर<br>३) श्री. मारुती दत्तू ठाकूर<br>४) श्री. जनार्दन दत्तू ठाकूर<br>५) श्रीमती प्रतिभा विष्णुदास पाटील,<br>६) कोंडूबाई कचेर नावडेकर | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. तसेच सदर हरकत अर्ज हे aclso.thane@cidcoindia.com या ईमेलवर सादर करावेत. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र/करारनामा करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/०५२/२०२२-२३

# संक्षिप्त...

## ट्रेलर व पिकअप वाहनांमधील अपघातात एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील पुणे-मुंबई लेनवर पनवेल तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत किमी १२.८०० येथे मध्यरात्रीच्या सुमारास ट्रेलर व पिकउप वाहनांमधील झालेल्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे

पीक अप क्र. एमएच ४८ बीएम ८३०९ यावरील चालक भरत अंबत (रा. तलासरी- पालघर वय ३२ वर्षे) याचे गाडीवरील नियंत्रण सुटून पुढे जाणाऱ्या ट्रेलर क्र. आरजे ३६ जीए ५३७९ वरील चालक महावीर सुरेश (रा. अजमेर, राजस्थान) यास पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. सदर अपघात मध्ये पीक अप चालक भरत अंबत याच्या उजव्या हातास किरकोळ दुखापत झाली आहे. सदर अपघात ग्रस्त वाहने आयआरबी कंपनीच्या क्रेन च्या साहाय्याने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत चालू केली. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## संत गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील श्री. क्षेत्र तळवली येथे संतश्रेष्ठ गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न करण्यात आला. वै.गुरूवर्य अलिबागकर महाराज, गोपाळ महाराज वाजे व धोंडूबाबा कोलटकर यांच्या क्रुपार्शिवादाने व ह.भ.प.दत्तू महाराज कोलटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त देवतांचे अभिषेक, महापूजा, कळशस्थापना, ध्वजारोहन, विना पहारा, भजन, दुपारी ह.भ.प.मदनमहाराज कोलटकर यांचे पुष्पव्रुष्टीपर किर्तनसेवा, व तद्नंतर महाप्रसाद, साय़.ह.भ.प.भूषण वरखले यांची प्रवचनसेवा, हरिपाठ, तर रात्रौ.ह.भ.प.टोंगळे गुरूजी खांब यांची हरिकिर्तनरूपी सेवा आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. तर पुण्यतिथी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तळवली व जय हनुमान क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# देशात सर्वात अग्रगण्य मानले जाणारे राज्य महाराष्ट्र आहे : आ.अनिकेत तटकरे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

महाराष्ट्र दिनानिमित्त तहसील कार्यालय श्रीवर्धनच्या वतीने प्रशासकीय भवन येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात कोकण स्थानिक स्वराज्य संस्थेचे विधान परिषद सदस्य आ.अनिकेत तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले, ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर आयोजित केलेल्या छोटेखाणी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना आमदार अनिकेत तटकरे म्हणाले की महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून राज्याने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे .



देशात अग्रगण्य मानले जाणारे राज्य हे महाराष्ट्र राज्य असल्याचा अभिमान आहे. या वेळी व्यासपीठावर प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी, मुख्याधिकारी विराज लबडे, नायब तहसीलदार विपुल ढुमे, पोलीस निरीक्षक संजय सावंत, माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक, माजी जि प सदस्या प्रगती अदावडे, माजी पं स सदस्य मंगेश कोबनाक, माजी नगर-सेवक अनंत गुरव, माजी नगरसेवक वसंत यादव सुनील पवार आदी मान्यवर उपस्थतीत होते. पुढे बोलताना आ.अनिकेत म्हणाले की राज्य शासनाने कोविडच्या महामारीत आरोग्यावर लक्ष केंद्रित केले होते. आज दोन वर्षानंतर विनामास्क आपल्याशी संवाद होतोय. श्रीवर्धन पोलीस ठाण्याची इमारत व कर्मचारी वसाहत जीर्णावस्थेत झाली आहे. लवकरच प्रस्ताव तयार करून पोलीस ठाण्यासाठी व वसाहती साठी नवीन इमारत उभारण्याचा प्रयत्न करू, पालकमंत्री आपल्या हक्काच्या असल्याने या मतदार संघात जास्तीत जास्त निधी प्राप्त करून घेऊ असे सांगून नैसर्गिक आपत्तीने या तालुक्याला खूप मोठे नुकसान केले. परत अशी नैसर्गिक आपत्ती येऊ नये अशी सोमजाई व हरेश्वर चरणी प्रार्थना करतो, आणि दुर्दैवाने नैसर्गिक आपत्ती आलीच तर प्रशासन तयारीनिशी सज्ज असल्याची ग्वाही दिली.


या वेळी श्रीवर्धन तहसील कार्यालयाच्या वतीने आ अनिकेत तटकरे यांच्या हस्ते पिवळ्या रेशन कार्ड धारकांना कार्डचे वाटप तसेच राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना अंतर्गत लाभार्थ्यांना चेकचे वाटप, मनरेगा जॉब कार्ड वाटप, नवीन मतदार कार्ड चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार सचिन गोसावी यांनी केले.

प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी मार्गदर्शन केले तर नगरसेवक वसंत यादव व मुख्याध्यापक ढाकणे यांनी शुभेच्छा दिल्या.

## सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.



सुभाष पुजारी हे २००३ मध्ये कोल्हापूर येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. सन एमपीएससीने घेतलेल्या स्पर्धापरीक्षा परीक्षा देउन २००९ मधे पोलिस उपनिरीक्षक झाले.ऑक्टोबर २०१० ते जुन २०११ नाशिक पोलीस अकादमी येथे पोलिस उपनिरीक्षक ट्रेनिंग पूर्ण केले. जुन २०११ ते मे २०१८ पर्यंत नवी मुंबई आयुक्तालयांतील पनवेल तालुका पोलिस ठाणे, उरण पोलीस ठाणे, नेरुळ पोलिस ठाणे, पनवेल क्राइम ब्रँच या ठिकाणी नोकरी केली आहे त्यामध्ये अनेक गुन्ह्यांची उकल त्यांच्याकडून करण्यात आलेली आहे.अनेक सामाजिक कार्य सुद्धा त्यांनी केलेले आहे. त्यानंतर त्यांची बदली १ जुन २०१८ पासुन महामार्ग सुरक्षा पथक या ठिकाणी झाली. मुंबई पुणे एक्स्प्रेसवेवर महामार्ग पोलिस केंद्र पळस्पे याठिकाणी प्रभारी म्हणून नोकरी केली. महामार्गावर अपघात कमी करण्यासाठी विविध योजना त्यांनी राबविल्या व महामार्गावर होणारे अपघाताचे प्रमाण कमी केले मृत्यूचा दर घटविण्यासाठी विशेष प्रयत्न केले पूर्ण कालावधीत अनेक गोरगरीब लोकांना, प्रवाशांना, वाहन चालकांना मदत केली तसेच अनेक आरोग्यविषयक शिबिरं घेतली. वाहनचालकांचे प्रबोधन केले पत्रके वाटली.

सुभाष पुजारी यांना त्यांनी पोलिस खात्यात आत्तापर्यंत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल २६० बक्षिसे त्यांना मिळालेली आहेत. त्याचप्रमाणे शरीरसौष्ठव खेळामध्ये त्यांनी २०२१ व २०२२ चा महाराष्ट्र श्री व भारत श्री किताब सलग दोन-वेळा मिळविला. तसेच ताश्कंद उझबेकिस्तान या ठिकाणी झालेल्या वर्ल्ड बॉडीबिल्डिंग अँण्ड फिजिक या आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये त्याने ८० किलो गटामध्ये ब्रान्झ मेडल मिळवले आहे.

सध्या १५ जुलै रोजी मालदीव येथे होणाऱ्या मिस्टर आशिया व नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मिस्टर वर्ल्ड या शरीरसौष्ठवाची स्पर्धेची सध्या ते तयारी करत आहेत. त्यांना मिळालेल्या पोलीस महासंचालक सन्मान चिन्हाबद्दल पोलिस खात्यातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच समाजातील सामाजिक राजकीय विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पत्रकारांच्या मागण्या शासनापर्यंत पोहचविणार : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पत्रकार विकास महामंडळाची स्थापना करावी, अशी मागणी करीत अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनच्या (एबीजेएफ) वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर खालापूर तहसील कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून पत्रकारांकडून करण्यात येत असलेल्या मागण्या शासनापर्यंत पोहचविणार, असे आश्वासन खालापूर तहसीलदार अय्युब तांबोळी यांनी आंदोलनकर्त्यांना दिले.



खालापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनिल विभुते यांनी देखील आंदोलनस्थळी भेट देत पत्रकारांच्या मागण्याबाबत सविस्तर चर्चा केली. दरम्यान, आम आदमी पार्टीचे प्रभारी डॉ. रियाज पठाण, खोपोली शहर उपाध्यक्ष शिवा शिवचरण आदींनी आंदोलनाला भेट देत पाठींबा दिला.

पत्रकारांची आर्थिक स्थिती चांगली नसून त्यांना बँकांकडून कर्ज घेताना खूप अडचणींना सामोरे जावे लागते, त्यामुळे पत्रकारांचे जीवन सुधारण्यासाठी केंद्र सरकारने पत्रकार विकास महामंडळाची स्थापना करावी आणि त्या महामंडळामार्फत 'मुद्रा लोन' प्रमाणे या महामंडळाने पत्रकारांना व्यवसायासाठी ५० हजार ते १० लाखांचे कर्ज द्यावे, अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासोबतच पत्रकारांसाठी स्वतंत्र हेल्थ कार्ड, पत्रकारांसाठी टोलमाफी आणि डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी ॲक्रिडेशन कार्ड अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन कडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जारी करण्यात यावे.

पत्रकारांच्या मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशनच्या वतीने १ मे २०२२ रोजी देशातील प्रत्येक तहसील कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनात अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन राष्ट्रीय उपाध्यक्ष फिरोज पिंजरी, महाराष्ट्र राज्य महासचिव खलील सुर्वे, कोकण प्रदेश अध्यक्ष नरेश जाधव, कोकण प्रदेश सचिव सुधीर माने हे सहभागी झाले असून अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन नेरळ शहर अध्यक्ष तथा विस्टा न्यूजचे संदेश साळुंखे, पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली (भारत) कोकण प्रदेश उपाध्यक्ष दशरथ मुणे, गणेश मते, मनोज कळमकर आदींनी आंदोलनाला भेट दिली.

## शिवसंपर्क अभियान २०२२२ अंतर्गत अनेकांनी केला शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज दिनांक १ मे २०२२ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून तसेच शिवसंपर्क अभियान-२०२२ अंतर्गत पनवेल ग्रामीण येथील विचुंबे गाव येथे नवीन शिवसेना शाखेचे व महाआरोग्य शिबिराचे तसेच रक्तदान शिबिराचे उद्द्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी विचुंबे गावातील महिला व पुरुषांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी महिला आघाडीच्या जिल्हासंघटिका सौ. रेखाताई ठाकरे, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक दिपक घरत, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका सौ. कल्पनाताई पाटील, विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, नवीन पनवेल शहर प्रमुख यतीन देशमुख, कळंबोली शहर समन्वयक गिरीश धुमाळ, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, विभाग प्रमुख विचुंबे विशाल भोईर, विभाग प्रमुख बिपिन झुरे, उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, उ.भा.सेल तालुका अध्यक्ष सी.पी. प्रजापती, महिला आघाडीच्या तालुका संघटिका सौ. अनीता डांगरकर, उपतालुका संघटिका सौ. टिया धुमाळ, विभाग संघटिका शारदा पाटील,



शाखा संघटिका ज्योती पाटील, (संस्थापक अभय घोंधळी फाउंडेशन ) अभय घोंधळी, उसरली गावचे सरपंच अतुल तांबे, सभापती पुरुषोत्तम भोईर, युवासेनचे ऋषभ मोहिते आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पक्ष्यांची घरटी बांधण्याची लगबग

### जिल्ह्यात यंदा वरुणराजा लवकर व मुसळधार बरसणार पक्षी निरीक्षकांच्या नोंदी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

हवामान विभाग जसा पावसाचा अंदाज देतो. त्याचप्रमाणे निसर्गात विविध पक्षी, कीटक, प्राणी देखील पावसाचा अंदाज देत असतात. पक्षांची घरटी बांधण्याची पद्धत, वापरलेले साहित्य व घरट्याची उंची यावरून पाऊस किती पडणार याचा अंदाज वर्तविणे सहज शक्य होते. जिल्ह्यात अशा प्रकारे पक्ष्यांची घरटी बांधण्याची लगबग सुरू झाली असून विणीच्या हंगामाला देखील सुरुवात झाली असल्याच्या नोंदी पक्षी निरीक्षकांनी नोंदविल्या आहेत. परिणामी यंदा जिल्ह्यात पाऊस लवकर व मुसळधार कोसळण्याची शक्यता आहे.

विळे येथील पक्षी निरीक्षक व निसर्ग अभ्यासक राम मुंढे यांनी येथील परिसर व जंगलात भटकंती करत असताना अशा अनेक घटनांच्या नोंदी केल्या आहेत. एप्रिल ते सप्टेंबर अनेक पक्षांच्या विणीचा हंगाम असतो, या हंगामात पक्ष्यांची घरटी बांधण्यासाठी रेलचेल चालू असते. कावळ्यांनी तर चक्क आपले घरटे बनवून त्यात अंडी उबवण्यासाठी आळी-पाळीने घरट्यातील मुक्काम वाढवला आहे. बहुतांशी घरटी झाडाच्या वरच्या भागात बांधली असून घरट्यांसाठी काटक्यांबरोबर तारांचा वापर अधिक केला आहे. पाटणुस येथील कुंडलिका विद्यालयाजवळ असणाऱ्या एका मोठ्या झाडा वर अगदी शेंड्याच्या जवळ कावळ्याने घरटे बांधून संसार थाटला आहे. तर आपली अंडी कावळ्याच्या घरट्यात टाकण्यासाठी कोकिळेची धावपळ दिसत आहे. विळे येथे मुंढे यांच्या घराच्या पाठीमागे गेल्या आठवड्यात कोकिळेचे चार नर व एक मादी हे एका झाडावर बसलेले होते आणि त्यांची कावळ्याच्या घरट्याच्या शोधात भटकंती चालू होती. पाटणुस परिसरात पांढऱ्या छातीचा धीवर म्हणजेच खंड्या आपल्या मादि सोबत घरट्यासाठी जागेचा शोध घेऊन बीळ खोदण्याच्या तयारीला लागलेले असल्याचे निरीक्षण मुंढे यांनी नोंदविले आहे. मागच्या वर्षी जी पिल्लं घरट्यातून बाहेर पडली आहेत ती आता मोठी झाली आहेत. आणि त्यांनी आपले जोडीदार निवडून घरट्यासाठी जागा शोधणे चालू केले आहे. या ठिकाणी अशी चार ते पाच खंड्या पक्षाच्या जोडप्यांची घरटे बांधण्याची म्हणजेच बीळ खोदण्याचे काम चालू आहे.

दयाळ पक्षी देखील घरट्याच्या तयारीला लागले आहेत. कधी नर पक्षी पाण्यातील शेवाळ आणि काड्या गोळा करून जाताना दिसतो तर त्याच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून मादी देखील त्याला मदत करतांना दिसते. साळुंख्या देखील काट्या गोळा करून करून आपले घरटे बनवण्याच्या तय्यारीला लागल्या आहेत. त्यांच्या विणीच्या हंगामाची तयारी चालू आहे. नारिंगी कस्तुर हा देखील आपल्या जोडीदाराला आकर्षित करण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. महाभृंगराज या पक्षाने आपले घरटे घनदाट जंगलात तयार करून त्यातील अंडी उबवण्याचे काम चालू केले आहे. तर पांढऱ्या पोटाचा कोतवाल या पक्षाची पिल्ले घरट्यातून डोकावतांना दिसत आहेत. बुरख्या हळद्या या पक्षांचे नर जंगलामध्ये झाडाच्या उंच फांदीवर बसून शीळ मारत मादीचा शोध घेत आहेत. अशा नोंदी देखील नोंदविण्यात आल्या आहेत.



## महापालिकेच्यावतीने भव्य रक्तदान व आरोग्य शिबीराचे कामोठ्यात आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे .या अंतर्गत महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आज( १ मे ) भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन कामोठे येथील माजी आमदार दत्तूशेठ पाटील विद्यालयात करण्यात आले. या आरोग्य शिबीर व रक्तदान शिबिराचे उद्घाटन अतिरीक्त आयुक्त तृप्ती सांडभोर,सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांच्या हस्ते करण्यात आले.

अतिरीक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी क्रिटीकेअर रुग्णालयाचे कार्डिलॉजीस्ट ऋषीकेश ठाकूर, डॉ.मधुकर राठोड, डॉ.कमलकिशोर गांधी,माजी नगरसेवक प्रमोद भगत ,समाजसेविका रंजना सडोलीकर, नवी मुंबई ब्लड बँकेचे विक्रम खूपकर , स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.खडबडे उपस्थित होते. आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानुसार झालेल्या रक्तदान व आरोग्य शिबिरांमध्ये क्रिटीकेअर रुग्णालयाच्यावतीने स्त्री रोग तपासणी, हाडांची तपासणी अशा विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. हेल्थ केअर डायग्नोस्टिकच्यावतीने मधुमेह, हिमोग्लोबीन,रक्त चाचण्या करण्यात आल्या.तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कामोठेच्यावतीने कोविड बुस्टर डोसचे लसीकरण आणि औषध- गोळ्यांचे वाटप करण्यात आले. याबरोबरच जीवनविद्या मिशनच्यावतीने अवयवदान अभियान राबविण्यात आले. उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रक्तदान व आरोग्य शिबिराचा एकुण ६५ जणांनी रक्तदान केले. सुमारे ३५० लाभार्थ्यांनी आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ घेतला. तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत माझी वसुंधरा विषयांवर घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे बक्षास वितरण यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



## वहाळ भूषण पुरस्कार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून वहाळ ग्रामपंचायत पंचायतीच्या वतीने वहाळ पंचक्रोशीतील तसेच पनवेल तालुक्यातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना वहाळ भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले,

त्यावेळी वहाळ ग्रामपंचायत पंचायतीच्या सरपंच पूजा समीर पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रविंद्र पाटील, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, जेष्ठ पत्रकार माधव पाटील, तंटामुक्ती गाव समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष रामदास नाईक, शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते नारायण घरत, वहाळ ग्रामपंचायत उपसरपंच अमर केसरीनाथ म्हात्रे, तसेच ग्रामपंचायत पंचायत सदस्य व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## राहटाड येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून इफ्तार पार्टीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

राहटाड येथील मुस्लिम समाजाच्या नागरिकांना तळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सध्या रमजान महिना सुरू असल्याने मुस्लिम बांधवांचा उपवास असतो. राष्ट्रवादी काँग्रेसकडून समाजातील प्रमुख नागरिकांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कैलास पायगुडे यांनी सर्व मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या.

राहटाड येथे सर्व समाजबांधव गुण्यागोविंदाने राहतात.दरवर्षी राहटाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, हनुमान जयंती, ईद ए मिलाद यासह विविध सण उत्सव सर्वांच्या सहभागातून उत्साहात साजरे केले जातात. या भागात एकता आणि बंधूता टिकवून सर्वजण एकमेकांच्या कार्यक्रमात हिरीरिने सहभागी होतात. त्याच पद्धतीने सलोखा राखत इफ्तार पार्टीचे आयोजन आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तळा तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे असे सांगून त्यांनी सर्व समाज बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस मागासवर्गीय सेलचे रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. उत्तम जाधव तालुका अध्यक्ष नाना भौड , राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ नेते पल्लवकर, मांदाडचे हापिस भाई, किशोर शिंदे, सुनील भौड,प्रवीण आंबार्ले, तन्वीी पल्लवकर,रहाटाड उपसरपंच अशोक खंडागळे शुभम महाडिक तसेच रहाटाड व मांदाड गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

